# भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(दुपार)

जा.क्र.२९२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २६/०४/२०१७

**१) संपततीचे कारणावरून भांडन, शिवीगाळ करून काठीने डोक्यावर मारून जखमी केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २४/०४/२०१७ चे २०.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी व आरोपी हे सख्खे भाऊ असुन १ महिन्यापुर्वी त्याचे मध्ये संपत्तीचे कारणावरून भांडन झाल्याने बोलाचाली बंद होती फिर्यादी व त्याची पत्नी हजर असतांना आरोपी हा फिर्यादीचे मुलांना नेहमी विनाकारण रागवत असुन त्यांच्या मुलांना घरी कशाला येवु देते असे आपले पत्नी जवळ बोलल्याने आरोपीने एकुन फिर्यादीस शिवीगाळ भांडन करून काठीने फिर्यादीचे डोक्यावर मारून जखमी केल्याने फिर्यादी भोलानाथ सुधाकर पचारे वय ३२ वर्ष रा. मासळ यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखांदुर येथे कलम ३२४,५०४ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. भलावी पो. स्टे. लाखांदुर हे करीत आहेत.

**२) खुल्या घरातुन चार्जींगला लावलेला मोबाइल चोरी केल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक २१/०४/०१७ चे ०७.३० वा.ते ०८.०० वा. दर. यातील फिर्यादीचे आपला रेड–मी– २ कंपनीचा मोबाईल किंमती ५०००/रू. चा आपले घरी टेबलवर चार्जींगवर लाऊन शेतावर गेला असता यातील संशयीत आरोपीने सुनामौका पाहुन फिर्यादीचे खुल्या घरात प्रवेश करून चार्जीगला लावलेला मोबाईल चोरून नेल्याने संशय व्यक्त केल्याने फिर्यादी लक्ष्मन लाखन चौधरी वय ४८ वर्ष रा. टेमनी याचे लेखी रिपोर्ट वरून पो.स्टे. सिहोरा येथे कलम ३८० भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोउपनि जटाळ पो. स्टे. सिहोरा हे करीत आहेत.

**३) चोरी करण्याच्या उद्देशाने आपले अस्तित्व लपवुन मिळुन आल्याने गुन्हा नोंद. :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे ०२.०० ते ०२.३० वा दरम्यान यातील आरोपी हा मोठा बाजार भंडारा येथे श्री. गंगाराम नागपुरे यांचे घरासमोरील सामाना जवळ चोरी करण्याच्या उद्देशाने लपतछपत आपले अस्तित्व लपवितांनी मिळुन आल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ. केवट यांचे रिपोर्ट वरुन पोस्टे भंडारा येथे कलम १२२(अ) मपोका. चा गुन्हा नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ. केवट पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहे

**४) सार्वजनिक ठिकाणी धोकादायक रित्या व वाहतुकीस अडथळा निर्माण होईल अश्या स्थितीत वाहन उभे करून मिळुन गुन्हा नोंदः–**

दिनांक २५/०४/०१७ चे १६.३० वा. दर. यातील आरोपीने आपले ताब्यातील वाहन आमरोड वर येणाऱ्या जाणाऱ्या वाहतुकीस तसेच लोकांच्या जिवीतास धोका निर्माण होईल अश्या स्थितीत ऊभी करतांनी मिळुन आल्याने पो.स्टे. गोबरवाही येथे कलम २८३ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोना. इंगोले पो.स्टे. गोबरवाही हे करीत आहेत.

**५) सार्वजनीक ठिकाणी दारू पिऊन दारूचे नशेत वाहन चालवितांनी मिळुन आल्याने गुन्हा नोंदः–**

दिनांक २५/०४/०१७ चे १७.०० वा. दर. यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील मोटार सायकल सार्वजनीक आमरोड वर दारू पिऊन दारूचे नशेत चालवितांनी मिळुन आल्याने त्यो ग्रामीन रूग्नालय पवनी येथील डॉक्टर कडुन दारू पिल्याचा अभिप्राय प्राप्त झाल्याने पो.स्टे. पवनी येथे कलम १८५ भादंवि अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. काडवते पो.स्टे. पवनी हे करीत आहेत.

**६) टॅक्टर चालकाच्या निष्काळजीपनामुळे स्कुटी चालकाला धडक मारून मागे बसलेल्या महिलेच्या मरणास कारणीभुत झाल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक २५/०४/२०१७ चे १५.३० वा. दरम्यान यातील फिर्यादी हा आपले ताब्यातील यॅाक्टीव्हा मोटार सायकल क्र. एमएच. ३६ डब्लु ६५९४ चे मागील सिटवर मृतक सौ. अंजुम मोरेश्वर कठाणे वय २८ वर्ष रा घरतोडा हिला बसवुन बेलाटी कडुन घरतोडा येथे डांबरी रोडने जात असता यातील आरोपी चालकाने आपले ताब्यातील ट्रॅक्टर भरधाव वेगाने, निष्काळजीपणे चालवुन मोटार सायकल ला धडक मारून मृतकचे मरणास कारणीभुत झाल्याने फिर्यादी चंद्रशेखर पुरूषोत्तम कठाणे वय ३४ वर्ष रा. घरतोडा यांचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पालांदुर येथे कलम २७९,३०४ (अ) भादंवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सपोनि. वाढीवे पो.स्टे. पालांदुर हे करीत आहेत.

**७) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २५/०४/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुन ७२ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०५, तीन सिटर वाहनांवरती ०७ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ६० केसेस करण्यात आलेल्या आहेत.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र.९९८७३८५४०५

प्रति,

**जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा**
वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.